# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र.  38/2023      दिनांक : 26.01.2024

## 1)चोरी :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 21.01.2024 रोजी 20.20 वा. चे दरम्यान, **तरोडेकर मार्केटच्या पाठीमागे बालाजी हाईटस विगर जिम नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे किचन मधील जिमचे किचनरूम मधील साहित्य व शुजचे 33 जोड किंमती 54,000/—रूपयाचा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी आनंद नंदकुमार जयस्वाल, वय 37 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. आनंदनगर सोसायटी सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 42/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1218 मठपती, मो. नं. 9420914042** हे करीत आहेत.

**2)कंधार :—** दिनांक 24.01.2024 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **महाराणा प्रताप चौक कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे साडु आजारी असल्याने त्यांना भेटण्यासाठी महाराणा प्रताप चौक कंधार येथुन कंधार ते नांदेड पांगरा मार्गे जाणारे महामंडळाचे बसने पांगरा येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे पत्नीचे गळयातील 6.5 ग्रॅम सोन्याची पोत किंमती 15,000/—रूपयाची चोरून नेली. वगैरे **फिर्यादी नारायण माणिका श्रीमंगले, वय 75 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शेकापुर ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 25/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो. नं. 9421849989** हे करीत आहेत.

## 2)पळवुन नेले :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 05.01.2024 रोजी चे सायंकाळी 19.00 वा. चे सुमारास, **पुयडवाडी ते पुणेगाव दरम्यान खुल्या रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे अनिल व्यंकटी राठोड, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी व ट्रॅक्टर चालक रा. हाळदा तांडा ता. कंधार जि. नांदेड** यांनी लोकमंगल कारखान्याचे ऊस तोडणी व वाहतुकीची कामे पुर्ण न करता उचल घेतलेली रक्कम परत केली नाही म्हणुन यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून पांढऱ्या बोलेरो मध्ये बसवुन अपहरण करून त्याचे कैदेत ठेवले. वगैरे **फिर्यादी व्यंकटी तुळशीराम राठोड, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा तांडा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 66/2024 कलम 365, 368 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हंबर्डे, मो.क्र. 9823040224** हे करीत आहेत.

## 3)फसवणुक :—

**इतवारा** :— दिनांक 15.09.2022 ते दिनांक 10.06.2023 चे दरम्यान, **देगलुर नाका खय्युम कॉम्पलेक्स देगलुर नाका चौकी समोर वळ नक्की नाही नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने शेयर मार्केटच्या नावाखाली दरमहा 10 ते 12 टक्के नफा करून देतो म्हणुन यातील फिर्यादीकडुन नगदी 7,13,400/—रू गुंतवणुक करून घेवुन त्यावरील एकुण 8,78,360/—रू असे एकुण 15,91,760/—रू फिर्यादी न देता साजिश करून विश्वासघात करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी इमरानखान पि. महम्मद सुलतानखान, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. देगलुर नाका पोलीस चौकी समोर नसेमन हॉटेल नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं. 21/2024 कलम 420, 406 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कुंडगीर, 9764606566** हे करीत आहेत.

## 4)जुगार :—

**इतवारा :—**दिनांक 25.01.2024 रोजी चे 25.01.2024 चे 12.45 वा. चे सुमारास, **इतवारा बाजार हनुमान मंदीरा जवळ सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1310/—रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/664 मोहन उत्तमराव हाक्के, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 22/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2081 मजाज, मो.नं. 02462—236510** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)भोकर :–** दिनांक 25.01.2024 रोजी चे 19.25 वा. चे सुमारास, **प्रॉपर भोकर शहरातील डॉ. आंबेडकर चौक ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2800/–रू ची व एक काळया रंगाची हिरो कंपणीची स्पलेंडर प्लस मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीयु–3681 किंमती 25,000/–रू असे एकुण 27,800/–रू ची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करीत असतांना ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दिगंबर पांडुरंग पाटील, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 21/2024 कलम 65 (ई), 83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1173 कानगुले, मो.नं. 9923320555** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 25.01.2024 रोजी चे 17.05 वा. चे सुमारास, **ढवळे कॉर्नर ते लातुर फाटा रोडवर नाईक कॉलेज समोर रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 3750/–रू ची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/संतोष शिवन्ना बेल्लुरोड, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 69/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो.नं. 9823236453** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**अर्धापुर :–**दिनांक 24.01.2024 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **मौजी लोण खुर्द शिवार शेत गट क्रमांक 62 ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रभाकर वसंत भारती, वय 42 वर्षे, रा. लोण खुर्द ता. अर्धापुर जि. नांदेड,** यांनी सततची नापीकी व बँकेचे कर्ज, व बचत गटाचे घेतलेले कर्ज कसे फेडावे या चिंतेतुन कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार आनंदास वसंत भारती, वय 49 वर्षे, व्यवसाय शेती रा. लोण खुर्द ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे अर्धापुर** आ. म्र. **06**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री राठोड, मो.नं. 9823143245** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड